# पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर

## "पोलीस शिपाई चालक भरती – 2019"

## –: उमेदवारांसाठी सुचना :–

- पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे आस्थापनेवरील रिक्त असलेल्या 87 "पोलीस शिपाई चालक" पदासाठी दिनांक 29/09/2021 रोजी लेखी परीक्षा, दिनांक 08/10/2021 ते 10/10/2021 पर्यन्त कौशल्य चाचणी आणि दिनांक 12/10/2021 रोजी शारीरिक चाचणी घेण्यात आली असून यामध्ये उमेदवारांना मिळालेल्या गुणांनुसार तात्पुरती निवडसूची व तात्पुरती प्रतिक्षासूची, उमेदवारांनी संकेतस्थळावर सादर केलेल्या अर्जाच्या व मैदानी चाचणी पुर्वी करण्यात आलेल्या कागदपत्र पडताळणीचे वेळी वैयक्तीक/भरती फॉर्ममध्ये भरण्यात आलेल्या माहितीच्या आधारावर बनविण्यात आली आहे. तात्पुरती निवडसूची व तात्पुरती प्रतिक्षासूची मुळ प्रमाणपत्र/कागदपत्रे पडताळणीच्या अधिन राहून प्रसिध्द करण्यात येत आहे. कागदपत्र पडताळणीमध्ये काही त्रृटी आढळून आल्यास प्रसिध्द करण्यात आलेल्या सूचीमध्ये फेरबदल होऊ शकतो, याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

- पोलीस भरती प्रकियेतील लेखी परीक्षेच्या वेळी परीक्षा केन्द्रावरील सीसीटीव्ही फुटेज व व्हीडीओ चित्रीकरण तसेच शारीरिक चाचणीपुंर्वी व चाचणीचे दरम्यान करण्यात आलेले व्हीडीओ चित्रीकरण व बायोमेट्रीक इत्यादींची तपासणीचे आधिन राहून सदरची तात्पुरती निवडसूची व तात्पुरती प्रतिक्षासूची तयार करण्यात आली आहे. यामध्ये काही आक्षेपार्ह आढळून आल्यास संबंधीत उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल तसेच त्यांचेविरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, तसेच भविष्यामध्ये उमेदवारांनी पोलीस भरती प्रकियेमध्ये गैरप्रकार केला होता असे निष्पन्न झाल्यास निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची निवड रद्द करण्याचा अधिकार पोलीस भरती निवड मंडळास आहे. यासंबंधात उमेदवारांचा कोणताही दावा/तकार/हक्क राहणार नाही, याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

- सदर भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने तात्पुरती निवडसूची व तात्पुरती प्रतिक्षासूची पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या www.mahapolice.gov.in आणि नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या www.nagpurpolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर सूचीसंबंधात काही हरकती/आक्षेप असल्यास संबंधीत उमेदवाराने दिनांक 12/05/2022 चे 16.00 वाजेपर्यन्त पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर (पोलीस भवन) कार्यालयात व्यक्तीशः/प्रत्यक्ष येऊन हरकती/आक्षेप सादर करावे.

दिनांक :– 11/05/2022
स्थळ :– नागपूर शहर

( चेतना तिडके )
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),
पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे करिता.